


१४] श्रीमती विठाबाई नाना फूलोरे, वय वर्षे ५८,

१५] श्रीमती शकुंतला पंडीत पाटील, वय वर्षे २६,
पंच श्रीमती लेखीबाई श्रीराम भद्रे
सर्वांचा धंदा शेती, सर्व रा. मौजे द्वारली, तालुका उल्हासनगर,




येणे प्रमाणे कुलमुखत्यारपत्र करुन देतो की,

अ] तुकडा व जिल्हा ठाणे, पोट तुकडा व तालुका उल्हासनगर, मौजे द्वारली, कल्याण महानगर पालिका हद्दीतील आमचे वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची व ताबे कब्जातील खालील वर्णनाची मिळकत आहे.

मौजे द्वारली, ता.उल्हासनगर येथील मिळकत.

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.प्र. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३४ | १ब+२अ+५अ | ०-४५-० | १-८८ |
| ३६ | ४ | ०-११-० | ०-२३ |
| ३८ | ० | २-१२-० | ३-१२ |
| ३९ | १ | ०-४७-८ | ४-२५ |
| | एकूण | ३-१५-८ | |

म्हणजेच सुमारे ३७८०० चौ.वार.

सदरचे मिळकतीचे वर्णन सोबतचे परिशिष्टात विस्ताराने दिले आहे. जीस यापूढे सदरची मिळकत

संक्षिप्ततेसाठी संबोधू.

ब] दि. ११.८.१९९५ चे विकास

प्राधिकरण करार जो मे. अंजानेया लॅन्ड अॅन्ड प्रॉपर्टी डेव्हलपर्स

हे डेव्हलपर्स म्हणून आम्ही ओनर्स म्हणून आणि मे. नरेश डेव्हलपमेंटस् अॅन्ड इनव्हेस्टमेंट हे कन्फर्मींग पार्टी म्हणून यांचेत झाला, त्याद्वारे आम्ही कन्फर्मींग पार्टीचे संमत्तीने सदरची मिळकत सदर मे. अंजानेया लॅन्ड अॅन्ड प्रॉपर्टी डेव्हलपर्स यांस विकास [redacted] साठी त्यातील अटी शर्तींवर देण्याचे मान्य केले आहे.

उहन-3
दस्त क्र २५७/२०१९
८५/१५७

सदर मिळकतीचा विकास [redacted] करणे त्यांना शक्य व्हावे म्हणून आम्ही त्यांस किंवा त्यांचे [redacted] ना कूलमुखत्यारपत्र देण्याचे मान्य केलेले आहे.

सबब आम्ही या लेखाद्वारे सदर मे. अन्जानेया लॅन्ड अॅन्ड प्रॉपर्टी डेव्हलपर्सचे भागीदार १] श्री. [redacted] बदनराज मेहता, २] श्री. मनोज के. देवरा, आणि ३] श्री. निलकंठ पोपट धनवट यांस आमचे कूलअखत्यारी म्हणून पसंत करून नेमीत आहोत व त्यांनीही आमचे कूलअखत्यारी म्हणून काम करण्यास मान्यता दिली आहे व त्यांनी सदर प्रॉपर्टी संबंधाने करावयाची कामे ही एकत्रितपणे [जॉइन्टली] वा एकेकट्याने [सेव्हरली] अशी करावयाची आहेत. सबब सदर मिळकतीचे विकास व विकसित कार्य शाबविणेकामी त्या संबंधाने त्यांनी करावयाची कामे पूढील प्रमाणे :-

उहन-3
दस्त क्र १०३५/२०१९
१०/२०३५

१] सदर मिळकतीचा ताबा/कब्जा घेऊन तिचा संभाळ करणे व विकास करणे.

२] आमचे अखत्यारांना योग्य वाटल्यास सदर मिळकतीच्या डेव्हलपमेंटबरोबर ठरलेला विक्री व्यवहार त्यांचे किंवा त्यांचे नॉमीनीजचे नांवे सदर मिळकतीचे कायम फरोक्तखत करुन पूर्ण करणे. सदर खरेदीखतावर आमचे वतीने व्हेन्डर्स म्हणून सह्या करणे व ते एक्झीक्यूट करणे. असे एक्झीक्यूट झालेले खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साहेब उल्हासनगर यांजकडे आमचे वतीने दाखल करणे व त्यांचे समोर ते एक्झीक्यूट केल्याचे मान्य करणे व नोंदणी पूर्ण होण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या त्या गोष्टी करणे.

३] सदरचे खरेदीखत करताना आधी ज्या ज्या काही गोष्टी, वा परवानग्या घेणे आवश्यक ठरतात त्या त्या गोष्टी आमच्या वतीने घेणे वा परवानग्या मिळविणे. त्यास्तव आवश्यक तेथे विनंती अर्ज करणे, कागदपत्रे सादर करणे, सत्यप्रतिज्ञालेख, जाहीरनामे, हमीपत्रे, जाबजबाब देणे, इत्यादी आवश्यक त्या गोष्टी करणे.

४] सदरची मिळकत ही उल्हासनगर नागरी